ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ पुणें, बुधवार तारीख १० ऑगस्ट, १९६० अंक ३१

## विविध माहिती

**पोलाद कारखान्यासाठीं मदत**—पाकिस्तानांत एक पोलादाचा कारखाना उभारण्यासाठीं अमेरिकेनें मदत देण्याची तयारी दाखविली आहे. कारखान्याच्या उभारणीबाबत कांहीं अमेरिकन तज्ज्ञ सध्यां पाकिस्तानांत आले आहेत. त्यांचा अहवाल हातीं आल्यावर कारखान्याच्या स्वरूपाचा निर्णय घेण्यांत येणार आहे.

**पाणबुड्यांच्या बांधणीवर जोर**—रशिआच्या नाविक दलांत अधिक पाणबुड्या ठेवण्यांत येणार आहेत. त्या दृष्टीनें पाणबुड्यांच्या बांधणीवर पूर्वीपेक्षा अधिक जोर देण्यांत येत आहे. पाणबुड्यांच्या बांधणीच्या कार्यक्रमाकडे रशिआचे पंतप्रधान जातीनें लक्ष घालीत आहेत. पाणबुड्यांमधून अण्वस्त्रें सोडण्यांत अलीकडे यश आलें आहे.

**अमेरिकन वैमानिकाची चौकशी**—रशिअन प्रदेशावर उड्डाण करीत असतांना खालीं पाडण्यांत आलेल्या अमेरिकन वैमानिकाची रशिआच्या लष्करी कोर्टांत चौकशी करण्यांत येणार आहे. कोर्टांत आपला बचाव करण्यासाठीं एखाद्या रशिअन वकिलाची मदत त्याला घेतां येईल. अमेरिकन वकिलाची मदत मात्र घेतां येणार नाहीं.

**पाकिस्तान-गोवा व्यापार**—पाकिस्तान सरकार आणि गोव्यामधील पोर्तुगालचें सरकार ह्यांच्या दरम्यान व्यापारी करार करण्यासंबंधींच्या वाटाघाटी लवकरच चालू होणार आहेत. गोवा पाकिस्तानला अशुद्ध लोखंड व मँगेनीझ ह्यांची निर्यात करण्यास तयार आहे. पाकिस्तान गोव्याला यंत्रसामग्री, कापड, इत्यादि माल देण्यास तयार आहे.

**१५,००० निर्वासित परतले**—आसाममध्यें सरकारी भाषेच्या प्रश्नावरून झालेल्या बंगाली विरोधी दंगलींत हजारो बंगाली पश्चिम बंगालमध्यें आले होते. त्यांपैकीं १५,००० निर्वासित आपआपल्या गांवीं गेले आहेत. त्यांना आपलीं जळलेलीं घरें उभारण्यासाठीं सरकारतर्फे मदत देण्यांत येत आहे. पुष्कळसे निर्वासित परत जाण्यास नाखूष आहेत.

**परदेशीय नागरिकांची नोंदणी**—गेल्या सात महिन्यांत भारतामधील नोंदणी झालेल्या परदेशीय नागरिकांची संख्या २,००० नीं घटली आहे. ३१ ऑक्टोबर १९५९ रोजीं ५५,१०४ परदेशीय नागरिकांची नोंद होती. १ जून १९६० रोजीं त्यांची संख्या ५३,१०४ इतकी होती. सर्वांत अधिक संख्या चिनी नागरिकांची होती. भारतांत ११,९३६ चिनी नागरिक होते. फ्रेंच नागरिकांची संख्या सर्वांत कमी म्हणजे ९९८ होती.

**इराकमधील तेल कारखाना**—इराक सरकारच्या तेल बोर्डानें दरसाल २० लाख टन अशुद्ध तेल शुद्ध करण्याचा नवा कारखाना उभारण्याचें ठरविलें आहे. इराकचे दक्षिणेकडील बंदर बसरा ह्या ठिकाणीं तो उभारण्यांत येणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठीं सुमारें २ कोटी पौंड भांडवल लागेल.

**कलाक्षेत्रासाठीं इमारत**—मद्रास जवळील 'कलाक्षेत्र' ह्या नृत्यविषयक संस्थेच्या कार्याचा व्याप वाढविण्यासाठीं अमेरिकेंत एक कमिटी स्थापन करण्यांत आली आहे. ही कमिटी संस्थेसाठीं २॥ लाख डॉलर्स गोळा करणार आहे. त्याचा उपयोग करून मद्रास येथें संस्थेसाठीं एक नवी इमारत बांधण्यांत येणार आहे.

**हिंदी भाषा सोपी करा**—भारताच्या निरनिराळ्या भाषांमधील शब्द हिंदींमध्यें रूढ करण्यांत येऊन ती अधिक सोपी करण्यांत यावी अशी सूचना राष्ट्राध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद ह्यांनीं केली आहे. त्यामुळें हिंदी भाषा अधिकाधिक लोकांना कळूं लागेल. हिंदी अधिक शुद्ध करीत गेल्यानें हें काम उलट अवघड होईल असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला.

**तेलवाहू जहाज मिळणार**—स्टँडर्ड व्हॅक्यूम ऑइल कंपनीनें भारताला तेलाची वहातूक करणारी एक मोठी बोट देऊं केली आहे. गेल्या मे महिन्यांत भारताचे दर्यामंत्री श्री. राजबहादूर अमेरिकेला गेले होते. त्यावेळीं भारतांत तेलाचा धंदा करणाऱ्या प्रत्येक कंपनीनें एक बोट द्यावी अशी सूचना करण्यांत आली होती.

**खतांच्या किंमतीबाबत धोरण**—खाजगी मालकीच्या खतांच्या कारखान्यांत तयार होणारें खत व सार्वजनिक मालकीच्या कारखान्यांत तयार होणारें खत ह्यांच्या किंमती कारखान्याच्या जागेवर सारख्याच असाव्या, असा निर्णय भारत सरकारनें घेतला आहे.

**क्षयरोग्यांसाठीं इस्पितळ**—उदयपूरपासून जवळ एका ठिकाणीं क्षयरोग्यांसाठीं एक नवें इस्पितळ बांधण्यांत येत आहे. ह्या इस्पितळांत ४०० रोग्यांची सोय होऊं शकेल. इस्पितळासाठीं १७ लाख रुपये खर्च येणार आहे. पूर्ण झाल्यावर तें आशिआंतील एक सुसज्ज इस्पितळ होईल.

**सौराष्ट्रांत तीन साखर कारखाने**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत सौराष्ट्रांत तीन नवे साखर कारखाने उभारण्यांत येणार आहेत. त्यांपैकीं दोन भावनगर जिल्ह्यांत व एक जामनगर जिल्ह्यांत उभारण्यांत येईल. जामनगर जिल्ह्यांतील साखर कारखान्याची उभारणी पूर्ण झाली आहे.

## भारताच्या बाजारपेठेबद्दल अनुकूल अहवाल

मॅक्रेन–एरिक्सन इन्कॉर्पोरेटेड नांवाच्या एका अमेरिकन कंपनीनें येत्या १० वर्षांत ज्या देशांतील बाजारपेठा विस्तार पावण्यासारख्या आहेत अशा २० देशांच्याबद्दल एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. ही कंपनी बाजारपेठांतील घडामोडींचें संशोधन करण्याच्या कामांत तज्ज्ञ समजली जाते. ह्या २० देशांत भारताचेंहि नांव आहे. अहवालांत असें म्हटलें आहे, कीं १९६० पासून सुरू होणाऱ्या दहा वर्षांच्या प्रारंभीं भारतामधील रहाणीचें मान अतिशय खालावलेलें दिसत आहे. सध्या अमेरिकेंतील उत्पादनाची जी पातळी आहे तिच्या अवघे २ टक्के दरडोई उत्पादन सध्यां भारतांत होत आहे. तथापि, अलीकडे भारताच्या अर्थव्यवस्थेंत फरक पडत चाललेला आहे. लोकसंख्या वाढत असली तरी उत्पादनहि वाढत आहे. ही घटना येत्या १० वर्षांत परिस्थिति सुधारण्याकडे कल दाखवीत आहे. लोकसंख्येच्या वाढीची सध्यांची गति लक्षांत घेतली तर पुढील १० वर्षांत लोकसंख्येंत १४ टक्के वाढ होईल असें दिसतें. ह्याच काळांत उत्पादन मात्र २८ टक्क्यानें वाढण्याची अपेक्षा आहे. शिवाय, भारतामधील पैसे गुंतविण्याच्या प्रमाणांत सापेक्षतेनें थोडी जरी वाढ झाली तरी त्याच्या योगानें उत्पादन मात्र बरेंच वाढण्याची शक्यता आहे. म्हणून भारताच्या अर्थव्यवस्थेंत सध्यां ज्या प्रवृत्ति दिसून येतात त्यांच्यामुळें अर्थव्यवस्थेच्या संभाव्य प्रगतीची कल्पना येण्यासारखी नाहीं. तेव्हां अमेरिकन धंदेवाल्यांनीं व उद्योगपतींनीं भारताच्या अर्थव्यवस्थेच्या येत्या दहा वर्षांतील संभाव्य वाढीकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. अशीच परिस्थिति आणखी १५ ते २० देशांत बनत चालली आहे. तिचा फायदा घेण्यासाठी अमेरिकन धंदेवाल्यांनीं तत्पर राहिलें पाहिजे.

## परदेशांत आणखी झोळी फिरविण्याचा रिझर्व्ह बँकेचा सल्ला

भारताच्या परदेशीय हुंडणावळीच्या गंगाजळींत, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या चार वर्षांत खूपच घट झाली आहे. ही गंगाजळी ९०२ कोटी रुपयांवरून ३६३ कोटी रुपयांवर आली आहे. गंगाजळी पांच वर्षांत फक्त २०० कोटी रुपयांनीं कमी होईल असा अंदाज होता; प्रत्यक्ष घट चार वर्षांत ५३९ कोटी रुपयांची झाली आहे. पांच वर्षांत मिळून ८०० कोटी रुपयांची परदेशी मदत मिळेल असा अंदाज होता; चारच वर्षांत १,०८१ कोटी रुपयांची परदेशी मदत पदरांत पडूनहि ही परिस्थिति घडून आली. आयातीसाठी मूळ अंदाजापेक्षा खूपच जास्त खर्च आला आणि निर्गत मात्र कमी होत गेली. तिसऱ्या वर्षाच्या मानानें चौथ्या वर्षी म्हणजे १९५९–६० मध्यें निर्गत ४७ कोटी रु. नीं सुधारली, पण प्रत्यक्ष निर्गत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या वर्षापेक्षा १२ कोटी रु. नीं आणि पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या वर्षापेक्षा १७ कोटी रु. नीं कमीच होती. रिझर्व्ह बँकेनें ह्या बिकट परिस्थितीवर उपाय योजना म्हणून निर्गत वाढवून आयात कमी करावी आणि परदेशी मदत भरपूर प्रमाणांत वेळेवर मिळवावी, असें सुचविलें आहे.

## पोलादाच्या उत्पादनांत एवढी वाढ नको

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत पोलादाच्या उत्पादनाचें १०२ लक्ष टनांचें उद्दिष्ट ठेवण्यांत आलें आहे, तें ८० लक्ष टनांवर उतरविण्यांत यावें, असें टाटा कंपनीचे चेअरमन श्री. जे. आर. डी. टाटा ह्यांनीं प्रतिपादन केलें आहे. अन्न, वहातूक, इत्यादींत आपण स्वयंपूर्ण होण्याच्या आधीच पोलादाच्या बाबतींत स्वयंपूर्णता गाठण्याची आवश्यकता नाहीं, असें त्यांचें मत आहे.

## ट्रायब्यूनलला गुप्त रिझर्व्हजची माहिती देण्याची बँकांवर जबाबदारी नाहीं

ताळेबंद आणि नफा-तोटा-पत्रक ह्यांत बँकांनीं न दाखविलेल्या स्पेशल रिझर्व्हसुसंबंधीं माहिती मागण्याचा ट्रायब्यूनलला किंवा इतर अधिकाऱ्यांना हक्क आहे किंवा नाहीं, ह्याविषयीं शंका दूर करण्यांत येत आहे. ह्या अंतर्गत रिझर्व्हजची गुप्तता रहावी, पण इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स ॲक्टखालीं निर्माण करण्यांत येणाऱ्या मंडळांना अशा रिझर्व्हजच्या रकमासंबंधीं रिझर्व्ह बँकेकडून, तज्ज्ञ संस्था ह्या दृष्टीनें, अभिप्राय मागवितां यावा, अशी तरतूद करणारें एक बिल अर्थमंत्र्यांनीं लोकसभेंत मांडलें आहे. कायद्याप्रमाणें जी माहिती ताळेबंदांत किंवा नफा-तोटा-पत्रकांत द्यावी लागत नाहीं, ती माहिती इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स ॲक्टाखालीं निर्माण करण्यांत येणाऱ्या मंडळांना बँकांनीं पुरविण्याची आवश्यकता नाहीं, हें स्पष्ट करण्यांत आलें आहे.

## नेपा मिलसची सर्वांगीण प्रगति

नेपा मिलसचें कागदाचें उत्पादन आतां दररोज १००·७ टनांपर्यंत पोंचलें आहे. चालू वर्षी कंपनी ४१ लक्ष रुपयांचा नफा दाखवून, ताळेबंदांतील जिंदगीच्या बाजूनें दिसणारा तोटा १३६ लक्ष रुपयांवरून ९५ लक्ष रुपयांवर आणील अशी अपेक्षा आहे. कंपनीनें मध्यप्रदेश सरकारचें ९५ लक्ष रुपयांचें कर्ज सव्याज फेडलें आहे. मध्यवर्ती सरकारचें कर्ज ३२ लक्ष रु. होतें, तें आतां ५ लक्ष रु. उरलें आहे.

# Results of G. D. C. & A.

The under-mentioned candidates are hereby declared by the Co-operation and Accountancy Diploma Board as to have passed the G. D. C. & A. Examination held in the month of March, 1960.

Passed in the whole Examination including those who have passed in one or the other part previously.

1st Class Nil
2nd Class Nil

**Pass Class**

S. A. Limaye, C. J. Upadhye, V. N. Vani.

**Passed in Co-operation Group only**

K. U. Baxi, C. R. Joshi, M. P. Mahajan, P. N. Chirmade, R. B. Deshpande, G. J. Joshi, T. B. Khedkar, P. S. Malhotra.

**Passed in Accounts Group only**

M. M. Mujumdar, H. M. Pathan, A. A. Kathiria, R. M. Pate.

**Passed in Banking Paper only**

B. A. Chaudhari

The following candidates have secured exemptions as detailed below :—

| | Paper No. | |
|---|---|---|
| C. R. Joshi | V & VI | Accounts Group |
| R. T. Dandade | V & VI | Accounts Group |
| K. F. Parekh | V & VII | Accounts Group |
| H. D. Patil | V, VII, VIII | Accounts Group |
| P. N. Pande | V & VII | Accounts Group |
| Miss S. V. Tumane | V & VI | Accounts Group |
| H. M. Pathan | I & III | Co-opn. Group |
| M. D. Patil | I & III | Co-opn. Group |

Sd/- L. N. Bongirwar
Registrar and Chairman

# अर्थ

बुधवार, ता. १० ऑगस्ट, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रूरकेला कारखान्यांतील कामगारांची परिस्थिति

रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्यांत राबणाऱ्या कामगारांच्या कामाच्या परिस्थितीसंबंधी ओरिसा सरकारच्या लेबर ऑफिसरने एक अहवाल तयार केला आहे. अहवाल तयार करण्यापूर्वी जी पाहणी अधिकाऱ्यानें केली, तीवरून ह्या कारखान्याच्या कांहीं खात्यांत कामगारांची रोजगारविषयक परिस्थिति फार दीनवाणी असल्याचें आढळून आलें आहे. अहवालांत असें म्हटलें आहे कीं एकंदरीनें मजूर–विषयक कायद्यांच्या पालनाबाबत कारखान्यांत अतिशय अनास्था दाखविण्यांत येत आहे. फॅक्टरी ॲक्टची दखल कित्येक बाबतींत घेण्यांत येत नाहीं, कामाच्या तासावर जी मर्यादा घालण्यांत आलेली आहे तिचें पालन करण्यांत येत नाहीं. कामगारांना साप्ताहिक सुटी देण्यांत येत नाहीं. किंवा त्यांनीं जादा काम केल्यास त्यांना जादा वेतनहि देण्यांत येत नाहीं. कामासंबंधीं ज्या सूचना वेळोवेळीं काढण्यांत येतात त्या कामगारांना कळविण्यासंबंधी फारच क्वचित् खबरदारी घेतली जाते. फॅक्टरी ॲक्टप्रमाणें कामगार–स्त्रियांना सायंकाळीं ७ वाजल्यानंतर कामावर लावतां येत नाहीं. पण ह्या कारखान्यांत कांहीं खात्यांत कामाच्या तिन्ही पाळ्यांत स्त्रियांकडून काम करवून घेण्यांत येते. स्त्री–कामगारांकडून रात्रीं काम करवून घेणें संपूर्णपणें बेकायदा आहे. फॅक्टरी कायद्याच्या ६६ व्या कलमांत असें काम करून घेण्यास बंदी घालण्यांत आलेली आहे. कांहीं खात्यांतून कामगारांना द्यावयाच्या वार्षिक पगारी रजेचा हिशेब सुद्धां ठेवण्यांत आलेला नाहीं; मग रजेच्या नियमांची अंमलबजावणी दूरच.

## भारताला आणखी मदतीची जरूरी

ब्रिटनमधील ऑक्सफर्ड कमिटी फॉर फॅमीन रिलीफ ह्या संस्थेतर्फे 'भुकेपासून मुक्तता' ह्या विषयावर नुकतेंच एक व्याख्यान करविण्यांत आलें. संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या अन्न व शेतकी उपसंघटनेचे माजी डायरेक्टर-जनरल, लॉर्ड बॉइड ऑर, ह्यांनीं वरील विषयावर आपले विचार त्यावेळीं व्यक्त केले. ते म्हणाले कीं, भारताला अनेक देशांकडून मदत मिळत आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु भारताची लोकसंख्या वाढत असल्यामुळें त्या देशापुढील लोकांच्या भुकेचा प्रश्न अजूनहि सुटण्याच्या मार्गावर नाहीं. ब्रिटनसारख्या कांहीं पाश्चात्य देशांतून अन्नाचा सुकाळ दिसत आहे. त्याचवेळीं भारताला मात्र पुरेसें अन्न मिळत नाहीं. भारतासारख्या देशांना पाश्चिमात्य देशांनीं अधिक मदत देणें अगत्याचें आहे. जगांतील सर्व देशांनीं शेतीची पद्धत जर उच्चतम पातळीवर नेली तर जगांतील अन्नाचें उत्पादन चौपटीनें वाढवितां येणें शक्य आहे. ह्या कामीं जगांतील सर्व देशांनीं जर सहकार्य केलें तर पृथ्वीवरून भुकेच्या आपत्तीचें उच्चाटन करतां येईल; आणि हें करण्यास १० वर्षांपेक्षा अधिक काळ लागणार नाहीं. जगाच्या वाढत चाललेल्या लोकसंख्येला सुद्धां पुढील १०० वर्षे अन्नाचा पुरवठा निश्चितपणें करतां येईल. मनुष्यजातीच्या उत्क्रांतींत आतां एक आणीबाणीची वेळ आलेली आहे. शास्त्रीय ज्ञानानें मनुष्याच्या हातीं प्रचंड नवी शक्ति दिलेली आहे जगांतील सरकारांना ह्या शक्तीचा उपयोग मनुष्यजातीच्या हितासाठी करण्याची बुद्धि आहे कां नाहीं, हाच काय तो प्रश्न आहे. एकमेकांच्या हितासाठी सहकार्य करणें अगर लढून एकमेकांचा नाश करणें असे दोनच मार्ग आतां उरले आहेत.

## पाणीपुरवठ्याच्या छोट्या योजनांचें महत्त्व

भारत–सरकारच्या शेतकीखात्याचे उपमंत्री श्री. एम्. व्ही. कृष्णप्पा ह्यांनीं पत्रकारांशीं बोलतांना शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या छोट्या योजनांचें महत्त्व विशद केलें आहे. ह्यासंबंधीं बोलतांना ते म्हणाले, कीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत पाटबंधाऱ्यांच्या छोट्या योजनांसाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. ह्या योजनांमुळें ९० लाख एकर जमिनीला हुकमी पाणी मिळावें अशी अपेक्षा आहे. प्रथम अशा कामांसाठी ७० कोटी रुपये मंजूर करण्यांत आले होते. पण त्यानंतर छोट्या योजनांवर अधिक भर देण्याचें ठरलें. म्हणून १०० कोटी रुपयांची सोय करण्यांत आली. छोट्या पाटबंधाऱ्यांच्या योजनेला अधिक महत्त्व देण्याला एक कारण झालें. 'भारताला परदेशी चलनाची टंचाई भासत होती. त्याचप्रमाणें योग्य प्रकारचे तंत्रज्ञहि भारताजवळ पुरेशा प्रमाणांत नव्हते. त्यामुळें कांहीं मर्यादेपलीकडे मोठ्या पाणीपुरवठ्याच्या योजना अंमलांत आणणें अशक्य होतें. अर्थात् छोट्या योजनांचा आसरा घेण्याशिवाय मार्गच नव्हता. शिवाय पाटबंधाऱ्यांच्या छोट्या योजनांचे फायदे लवकर पदरांत पडतात आणि त्यांच्यामुळें चलनवृद्धीला थोडाबहुत आळाहि बसतो. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत छोट्या योजनांचा जो अनुभव आला त्यावरून तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत त्यांना अधिक जोराची चालना द्यावी असें वाटू लागलें आहे. तिसऱ्या कार्यक्रमांत ह्या खर्चाचें उद्दिष्ट ३०० कोटी रुपये ठरविण्यांत आलें असून भीजजमिनीचें उद्दिष्ट १·४ कोटी एकर पाठविण्यांत आलें आहे.

## भारतांतील बँकांविषयीं माहितीचे तक्ते

बँकिंगमधील घटनांचा आढावा घेणारें रिझर्व्ह बँकेचें "रिपोर्ट ऑन ट्रेन्ड अँड प्रोग्रेस ऑफ बँकिंग" प्रकाशन गेल्या मे महिन्यांत प्रसिद्ध झालें, त्याला पूरक असें "स्टॅटिस्टिकल टेबल्स रिलेटिंग टु बँक्स इन् इंडिया, १९५९" हें प्रकाशन आतां उपलब्ध झालें आहे.* त्यावरून बँकिंगच्या सर्वांगीण प्रगतीची स्पष्ट कल्पना येते. जिंदगींत आणि कर्जांत मोठी वाढ झाल्यामुळें बँकांचें उत्पन्न वाढून निव्वळ नफाहि वाढला. हिंदी शेड्यूल्ड बँकांचा नफा १९५९ मध्यें १९५८ चे मानानें ३·२ कोटी रुपयांनीं वाढला. १९५८ मध्यें तो १९५७ चे मानानें २·० कोटी रुपयांनीं कमी झाला होता. विदेशी शेड्यूल्ड बँकांचा निव्वळ नफा ०·५ कोटी रुपयांनीं सुधारून २·६ कोटी रु. भरला. शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत १९५७ मध्यें ३०९ ची व १९५८ मध्यें ३५६ ची भर पडली होती; १९५९ मध्यें २९७ कचेऱ्यांची भर पडून त्यांची एकूण संख्या ३,९२६ झाली.

* किं. ७ रु. संक्षिप्त आवृत्तीची किं. २ रु.

## हिंदी शेड्यूल्ड बँकांचें उत्पन्न व खर्च

### १९५५ ते १९५९

आंकडे लक्ष रु. चे

| | १९५५ | १९५६ | १९५७ | १९५८ | १९५९ |
|---|---|---|---|---|---|
| बँकांची संख्या | ६९ | ७० | ७२ | ७६ | ७६ |
| **उत्पन्न** | | | | | |
| १ व्याज, डिव्हिडंड, कमिशन, एक्सचेंज ह्यांचें उत्पन्न. | | | | | |
| (अ) खरेदी केलेलीं व डिस्कौंट केलेलीं बिलें | ३,६४५ | ४,६७·७ | ६,५७·७ | ६,४९·८ | ७,३७·९ |
| (ब) कर्जें | १९,५०·२ | २३,८८·६ | ३२,६८·४ | ३६,९६·० | ३९,९२·७ |
| (क) गुंतवणूक | | | | | |
| (i) सरकारी रोखे | ९,००·९ | ९,३८·१ | ९,६०·० | १३,७९·१ | २०,०३·२ |
| (ii) इतर | १,१६·० | ९५·८ | १,१४·३ | १,६०·४ | २,००·४ |
| (ड) बँकांतील ठेवी | १६·० | २२·६ | ५९·८ | १,२३·२ | ७९·९ |
| (इ) इतर मार्ग | | | | | |
| (i) लेटर्स ऑफ क्रेडिटवरील कमिशन | ७,७६·० | १,६४·२ | १,५८,३ | १,४७·९ | १,७२·४ |
| (ii) कलेक्शनसाठी बिलें | | ३,४१·६ | ३,०८·५ | ३,३२·७ | ३,६८·२ |
| (iii) टी. टी. व डी. डी. ची विक्री | | १,१८·२ | १,३७·१ | १,४८·९ | १,६४·८ |
| (iv) इतर सर्व्हिस चार्जेस | | ३,७७·९ | ५,१६·६ | ५,४१·८ | ५,९०·६ |
| २ एकूण उत्पन्न (१ ची बेरीज) | ४१,२३·७ | ४९,१४·८ | ६१,८०·७ | ७१,७९·८ | ८३,१७·२ |
| ३ पूर्वी लिहून टाकलेल्या जिंदगींची वसुली व जिंदगींच्या विक्रींत नफा | २१·७ | १७·० | १८·२ | ५५·४ | ६५,० |
| ४ (२ व ३ ची बेरीज) | ४१,५°·४ | ४९,३१·८ | ६१,९९·० | ७२,३५·२ | ८३,८२·२ |
| **खर्च** | | | | | |
| ५ दिलेलें व्याज, कमिशन व ब्रोकरेज | | | | | |
| (अ) ठेवी | ११,७८·१ | १४,२१·६ | २१,३०·६ | ३०,४७·७ | ३४,११·७ |
| (ब) कर्जाऊ रकमा | ६२·४ | १,४९·० | १,३७·५ | ४४·१ | १,०३·७ |
| (क) इतर खातीं | २४·५ | ३५·२ | ३५·४ | ४६·१ | ६०·४ |
| ६ नोकर वर्गाचा पगार | १६,०८·४ | १७,२०·० | १९,६३·९ | २२,८४·६ | २५,७३·५ |
| (ड) इतर चालू खर्च | ४,४३·७ | ४,९९·६ | ५,६२·४ | ६,३७·७ | ७,१३·० |
| ७ कर, पट्ट्या (नफ्यावरील कर वगळून) | ४५·४ | ५०·९ | ५५·९ | ५७·२ | ६१·० |
| ८ एकूण खर्च (५ ते ७) | ३३,६२·५ | ३८,७६·० | ४८,८५·७ | ६१,१३·३ | ६९,२३·३ |
| ९ घसारा | ४६·३ | ४७·५ | ६३·० | ७१·६ | ९१·६ |
| १० एकूण खर्च (८ व ९ ची बेरीज) | ३४,०८·८ | ३९,२३·५ | ४९,४८·७ | ६१·८४·९ | ७०,१४·९ |
| ११ नफा (करापूर्वी) | ७,३६·६ | १०,०८·३ | १२,५०·३ | १०,५०·३ | १३,६७·३ |
| **नफ्याचा व शिलकी वाढाव्याचा विनियोग** | | | | | |
| १२ उपलब्ध रकमा कशांतून ? | | | | | |
| (i) नफा | ७,३६·६ | १०,०८·३ | १२,५०·३ | १०,५०·३ | १३,६७·३ |
| (ii) पूर्वीचा शिलकी नफा | ८६·६ | ८४·७ | १,०५·३ | ९८·५ | १,०३·३ |
| (iii) रिझर्व्हमधून | ७·६ | ८·१ | ०·२ | १६ | २·७ |
| एकूण | ८,३०·८ | ११,०१·१ | १३,५५·८ | ११,५०·४ | १४,७३·३ |
| १३ नफ्याचा विनियोग | | | | | |
| (अ) नफ्यावरील कराची तरतूद | १,७४·६ | २,९६·७ | ४,०७·४ | २,३५·६ | ३,९६·५ |
| (ब) रिझर्व्ह फंडाकडे वर्ग | ८१·७ | १,४३·१ | १,८९·० | १,५६·८ | १,४७·८ |
| (क) भागांवर डिव्हिडंड व बोनस | २,७४·८ | २,९२·६ | ३,१७·२ | ३,२८·६ | ३,८९·८ |
| (ड) नोकरांना बोनस | १,१४·७ | १,४३·२ | १,६१·१ | १,८०·५ | १,९७·८ |
| (इ) इतर तरतुदी | १,०१·२ | १,२०·० | १,६३·३ | १,३७·६ | २,२३·९ |
| (उ) ग्रॅच्युइटीची तरतूद | ... | ... | १३·५ | २४·५ | ३७·० |
| पुढील वर्षांत ओढलेला नफा | ८३·८ | १,०५·५ | १,०४·३ | ८६·८ | ८०·५ |
| एकूण | ८,३०·८ | ११,०१·१ | १३,५५·८ | ११,५०·४ | १४,७३·३ |

## उद्योगपतींच्या मार्गदर्शनाची सोय

महाराष्ट्र सरकारनें डायरेक्टोरेट ऑफ इंडस्ट्रीजमध्यें आतां एका संपर्क अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे. कामकाजाच्या पद्धती, राज्य व मध्यवर्ती सरकार यांचीं धोरणें, उद्योगधंद्याच्या जागा व उद्योगधंद्याची वाढ होण्यासाठीं राज्य व मध्यवर्ती सरकारें देत असलेल्या सवलती, याबाबत हा संपर्क अधिकारी उद्योगपतींना स्थूल स्वरूपाचें मार्गदर्शन करील.

नवीन छोटे अथवा मोठे उद्योगधंदे स्थापन करतांना कांहीं विशिष्ट पद्धतीचा अवलंब करावा लागतो. छोट्या उद्योगधंद्यांच्या बाबतींत ह्या पद्धतींची पुष्कळदां माहिती एकाच ठिकाणीं गोळा करणें कठीण जातें; कारण सरकारच्या अनेक खात्यांचा या पद्धतींशीं संबंध येत असतो. कामकाजासंबंधीच्या आवश्यक त्या माहितीसाठीं उद्योगपतींना ठिकठिकाणीं जावें लागत असल्यानें त्यांची गैरसोय होते. एवढेंच नव्हे तर त्यामुळें औद्योगिक क्षेत्रांत नव्यानें प्रवेश करणारा निरुत्साहि बनतो. उद्योगधंद्याची निवड करण्यापूर्वीं, राज्य व मध्यवर्ती सरकारच्या धोरणासंबंधीच्या कांहीं बाबींचा विचार करणें आवश्यक असतें. उदाहरणार्थ, राज्य व मध्यवर्ती सरकार नवीन वीज–माग ( सहकारी क्षेत्रांतील सोडून ) व तेलघाण्या यासारखे उद्योगधंदे स्थापन करण्यास उत्तेजन देत नाहीं. नियंत्रित कच्चा माल लागणारे विशिष्ट धंदे केवळ छोट्या उद्योगधंद्यांच्या क्षेत्रासाठींच राखून ठेवण्यांत आले आहेत. कांहीं उद्योगधंद्यांचा विकास पुरेशा कुवतीपर्यंत यापूर्वींच झाला असल्यानें भारत सरकार छोट्या व मोठ्या उद्योगधंद्याच्या क्षेत्रांतील कांहीं उद्योगधंद्यांना उत्तेजन देऊं इच्छित नाहीं. उद्योगधंद्याच्या जागांच्या बाबतींत, स्थानिक अधिकाऱ्यांनीं औद्योगिक विकासासाठीं कांहीं विशिष्ट जागा राखून ठेवण्याच्या योजना आंखलेल्या असतात.

ही सर्व आवश्यक माहिती एकाच ठिकाणीं मिळविणें शक्य नसल्यानें, उद्योगधंदे खात्यामध्यें संपर्क अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत आली आहे.

उद्योगधंद्याबाबतची अतिशय उपयुक्त माहिती असलेलें व आंकडेवार माहिती असलेलें एक तिमाहि बुलेटिनहि हें डायरेक्टोरेट प्रसिद्ध करतें.

याबाबत माहिती हवी असणाऱ्या इसमांनीं डायरेक्टोरेट ऑफ इंडस्ट्रीजचे संपर्क अधिकारी, खोली नं. २०८, सचिवालय ( ॲनेक्स ), मुंबई, यांचेकडे विचारणा करावी.

**पश्चिम विभागाचा अन्नविभाग?**—मध्यप्रदेश, महाराष्ट्र व गुजरात हीं तीन राज्यें मिळून एक अन्नविभाग निर्माण करण्यांत येण्याची शक्यता आहे. अशा विभागाला मध्यप्रदेश सरकारचा विरोध होता. मध्यप्रदेशांतील शिलकी गव्हापुरताच हा विभाग मर्यादित राहील. अमेरिकेकडून १·७ कोटी टन गहूं मिळणार असल्यामुळें मध्यप्रदेशांतील गव्हाची बाजवीपेक्षा अधिक निर्यात होणार नाहीं अशी अपेक्षा आहे.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

अन्नाचें रहस्य


बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

किर्लोस्कर
•"कॉटेज" हॅन्ड शेंगायंत्र
•"कल्याण" हॅन्ड व पॉवर शेंगायंत्र
•"कल्याण" पॉवर शेंगायंत्र
शेंगा यंत्रें

बी-बियाण्यासाठीं, मोठ्या प्रमाणावर शेंग फोडण्यासाठीं अथवा तेल गिरण्यासाठीं या यंत्राचा उपयोग होतो. आपल्या उद्योगासाठीं योग्य अशा यंत्राची निवड करा व आपल्या मिळकतीत वाढ करा. यंत्राचे सुटे भाग ताबडतोब मिळूं शकतात.
किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड, किर्लोस्करवाडी, द. सातारा

## उसाच्या सुधारलेल्या जाती

उसाच्या शेतीमध्यें क्रांतिकारक बदल करणारी को. ४१९ ही जात 'पाडेगांव ऊंस संशोधन केन्द्रानें' १९३६ सालीं प्रसाराकरतां बाहेर दिली. काळजीपूर्वक केलेल्या संशोधनांतून असें दिसून आलें कीं, को. ४१९ ही जात पुंड्या, ई. के. २८, को. ४१३ वगैरे प्रचलित जातींपेक्षा सरस आहे. तेव्हांपासून ते आज तागायत या जातीचें प्रभुत्व उसाच्या शेतीवर आहे. या जातीनें हजारों शेतकऱ्यांना व साखर कारखान्यांना संपन्नावस्थेकडे नेलें आहे आणि म्हणूनच या जातीला दिलेली, 'दक्षिणेंतील आश्चर्यकारक ऊंस' ही संज्ञा योग्य होय. कोणत्याहि तऱ्हेनें एकहि पैसा जास्त खर्च न करितां अधिक उत्पादन वाढवण्याचा सुधारलेली जात वापरणें हा एक हमखास मार्ग आहे आणि हें ओळखून पाडेगांव केंद्र उसाच्या जातीच्या संशोधनावर फार भर देत आहे. कोणतीहि सुधारलेली जात शेतकऱ्यांना देण्याचे आगोदर कमींत कमी १० वर्षे तरी तज्ज्ञ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली त्या जातीचे प्रयोग केले जातात.

### नव्या जाती व त्यांची चांचणी

निरनिराळ्या उत्तम जातींचा संकर करून त्यापासून नव्या जाती तयार करण्याचें काम 'कोइमतूर शुगरकेन ब्रीडिंग इन्स्टिटयूट' या ठिकाणीं चालतें व उसाचें बीं धरण्यास लागणारें अनुकूल हवामान तेथें आहे. तसेंच आधुनिक यंत्रसामुग्रीनें सुसज्ज असें तें केंद्र आहे. त्या केंद्रावरून दरवर्षी सुमारें ४०–५० जाती पाडेगांव केंद्राकडे प्रयोग करण्याकरतां पाठवण्यांत येतात. या नवीन जातींना पहिल्या वर्षी पाडेगांव येथील हवामानाची संवय होते व प्रयोगाकरतां लागणारें बेणेंहि वाढवण्यांत येतें. दुसऱ्या वर्षी या नवीन जातींची प्राथमिक चांचणी होते. या चाचणींत त्या जातींच्या उसाचें उत्पन्न, साखरेचें प्रमाण, निरोगीपणा वगैरे गुणधर्म स्थानिक जातींशीं तुलनात्मक दृष्टीनें तपासण्यांत येतात. अशा तऱ्हेनें ३ वर्षे चांचणी होते. या ३ वर्षांच्या चांचणीनंतर ज्या जाती स्थानिक जातीपेक्षा सरस ठरतील त्यांना पुढील म्हणजे उपांत्य चांचणीकरतां पुढें पाठवण्यांत येतें. उपांत्य चांचणींत या जाती पुन्हा स्थानिक जातींशीं तुलनात्मक दृष्ट्या ३ वर्षे तपासल्या जातात. या चांचणींत प्रत्येक जातीखाली असणारें क्षेत्र वाढवण्यांत येतें. या चांचणींत निरोगी असून स्थानिक जातीपेक्षा उसाच्या व साखरेच्या उत्पन्नाच्या दृष्टीनें ज्या जाती सरस ठरतील अशा कांहीं जातीच अंत्य चांचणीकरतां निवडल्या जातात. अंत्य चांचणींत थोड्या जाती असल्यानें प्रत्येक जातीचा अधिक काळजीपूर्वक अभ्यास केला जातो. ज्या जाती अंत्य चांचणीस निवडल्या जातात त्या जाती राज्यांतील अकलूज, कोल्हापूर, देवळाली, लखमापूर, कोपरगांव व व्यास, या सहा उपकेन्द्रांकडे व सर्व साखर कारखान्याकडे प्रयोगाकरतां पाठवण्यांत येतात. अशा तऱ्हेनें सर्व जमीनप्रकारांवर या जातींचीं तीन वर्षे चांचणी झाल्यावर ज्या जाती निरोगी असून उसाच्या व साखरेच्या उत्पादनामध्यें स्थानिक जातीपेक्षा श्रेष्ठ ठरतील त्या जाती मोठ्या प्रमाणावर प्रत्येक जिल्ह्यांतील प्रगतीशील शेतकऱ्यांच्या शेतांवर तपासल्या जातात. या सर्व ठिकाणीं जी जात आपलें श्रेष्ठत्व टिकवेल ती जात सुधारलेली जात म्हणून सर्वत्र प्रसारीत करण्यांत येते. अशा रीतीनें अत्यंत काळजीपूर्वक अशा ८–१० वर्षांच्या प्रयोगानंतरच चांगल्या जाती शेतकऱ्यांना देण्यांत येतात.

उसाचे तीन मुख्य उपयोग आहेत. एक म्हणजे साखर तयार करणें, दुसरा गूळ तयार करणें, तिसरा व कमी महत्त्वाचा म्हणजे साण्याकरतां वापरणें. यापैकी प्रत्येक उपयोगाकरतां योग्य अशा जाती निवडून काढण्याचें काम पाडेगांव केन्द्रावर अव्याहत चालू आहे. १९३६ नंतर अनेक वर्षांच्या संशोधनानंतर चार उत्कृष्ट जाती केन्द्राला सांपडल्या आहेत. या जातींचीं नांवें अशीं:— (१) को. ६७८, (२) को. ७४० (३) को. ७७५ (४) को. ७९८. आडसाली लागणीस या सर्व जातींना तुरा येतो. तसेंच उसाच्या व साखरेच्या उत्पादनांत या जाती आडसाली लागणीस को. ४१९ जातीपेक्षा २०–२५ टक्क्यानें अधिक आहेत. या जातींची अधिक उत्पादनक्षमता लक्षांत घेऊन शेंकडों शेतकरी व साखर कारखाने या जातींची अव्याहत मागणी करीत आहेत. या जातींचे विशेष गुणधर्म पुढीलप्रमाणें आहेत.

### चार उत्कृष्ट जाती व त्यांचे गुणधर्म

**को. ६७८**—ही जात हिरवटसर पिंवळी असून लांब पेऱ्याची आहे. ही जात मध्यम जाड असून, को. ४१९ बरोबरच पक्व होते. पाडेगांव येथें आडसाली लागणीस या जातीच्या उसाचें सरासरी एकरीं उत्पन्न ६५ टन आलें. तेंच को. ४१९ चें ५२ टन आलें. उगवण आल्यापासून या जातीची वाढ फारच जलद होते. विशेषतः हलक्या जमिनीवर ही जात वापरणें फारच श्रेयस्कर ठरतें. या जातीचीं पेरीं लांब असल्यानें साखर कारखान्याच्या' गळिताला ही जात सोयीस्कर आहे. या जातीचा गूळ चांगला होत नाहीं. आणि म्हणूनच साखर कारखान्यांना ऊंस पुरवणाऱ्या बागाईतदारांस ही जात फारच सोयीस्कर आहे. सुरू व ऑक्टोबर लावणीस ही जात जास्त चांगली असते. आडसाली लावणीस या जातीचा ऊंस फार लोळतो. या जातीचा खोडवा चांगला होतो व साधारण खारवट व चोपण जमिनीवर ही जात तग धरूं शकते.

**को. ७४०**—प्रति को. ४१९ म्हणतां येण्यासारखी ही दुसरी सुधारलेली जात होय. ही जात पिवळसर रंगाची असून याचीं पेरीं मध्यम लांब आहेत. ही जात मध्यम जाड असून गळिताला कडक आहे. या जातीला अतोनात फूट फुटते. वाढीचा पहिला ५–६ महिन्यांचा काल फूट फुटण्याकडे खर्च होत असल्यानें पहिल्यानें वाढ खुजट वाटते परंतु एकदां फूट फुटण्याचें कार्य पुरें झाल्यावर मात्र याची वाढ झपाट्यानें होते. पाडेगांव येथें आडसाली लागणीस या जातीच्या उसाचें सरासरी एकरीं उत्पन्न ६८ टन आलें, तर को. ४१९ चें ५२ टन आलें. या जातींतील साखरेचें प्रमाण को. ४१९ पेक्षा जास्त असल्यानें एकरीं साखरेचा उतारा को. ४१९ पेक्षा २०–२५ टक्के जास्त आहे; ही जात को. ४१९ पेक्षा १०–१५ दिवस अगोदर तयार होते. या जातीचा गूळ रंगाला व प्रतीला उत्कृष्ट होतो. पाण्याचा ताण सहन करण्याची या जातीची शक्ति चांगली असल्यानें विहिरीवर ऊंस लावणाऱ्या शेतकऱ्यास ही जात फायदेशीर ठरेल. भारी जमिनीवर या जातीचें उत्पादन चांगलें येतें. तसेंच हलक्या परंतु योग्य निचरा असलेल्या जमिनींत खतपाणी भरपूर दिल्यास या जातीचें उत्पादन समाधानकारक येऊं शकतें. ही जात ऑक्टोबर लागणीस उत्कृष्ट आहे. ऊंस पक्व झाल्यावर या जातींतील साखरेचें प्रमाण १–१॥ महिना टिकून राहातें आणि म्हणूनच साखर कारखान्यांना ही जात विशेष फायदेशीर ठरेल. मोठ्या गूळ उत्पादकांसाहि जात योग्य ठरेल. या जातीचा खोडवा उत्कृष्ट येतो.

**को. ७७५**— गुळाच्या उत्कृष्ट प्रतीकरितां सर्वत्र नावाजलेली अशी ही तिसरी सुधारलेली जात होय. विशेषतः कोल्हापूर भागांतील जमिनींत व हवामानांत या जातीचें पीक भरघोस येतें. ही जात रंगाला पिवळसर आहे. या जातीचीं पानें रुंद असून पानाच्या

देठांवर भरपूर कूंस असतें. ही जात सरळ वाढते. लोळण्याचें प्रमाण फारच कमी असल्यानें आडसाली लागणीस फारच योग्य. पाडेगांव येथें आडसाली लागणीस या जातीचें उत्पन्न एकरीं सरासरी ६० टन आलें आहे, तर को. ४१९ चें ५२ टन आलें आहे. या जातींत साखरेचें प्रमाण सर्व सुधारलेल्या जातीपेक्षा जास्त असल्यानें साखरेचा उतारा को. ४१९ पेक्षा २० टक्क्यांनीं अधिक आहे. चांगल्या योग्य निचऱ्याच्या भारी जमिनीवर ही जात जास्त उत्पादन देते. खारवट व चोपण जमिनीवर ही जात चांगला टिकाव धरते. गुळाचा रंग केशरी असून कणाला उत्कृष्ट असल्यानें गुळाला टिकाऊपणा अधिक आहे. ऊंस साधारण मऊ असल्यानें खाण्याकरतां या जातीचा चांगला उपयोग करतां येईल. ही जात को. ४१९ पेक्षा १०–१५ दिवसांनीं लवकर तयार होत. असल्यानें सुरवातीच्या गळतीस वापरल्यास साखर कारखान्यांना साखरेचा उतारा चांगला मिळूं शकेल. आजतागायत तरी या जातीवर अपायकारक असा मोठा कोणताच रोग नाहीं. या जातीचा खोडवा चांगला येतो.

को. ७९८—ही जात राजस प्रवृत्तीची आहे. म्हणजे हवामान, जमीन, खत, पाणी वगैरे सर्व गोष्टी अनुकूल असल्यास ही जात चांगलें उत्पादन देऊं शकतें. ही जात हिरवटसर रंगाची असून कांडें आखूड व फुगीर आहे. तसेंच पानाच्या देठावर तपकिरी रंगाचे ठिपके असतात. ऊंस साधारण मऊ असल्यानें खाण्यास वापरतां येईल. खारवट व चोपण जमिनीवर या जातीचें समाधानकारक पीक येत नाहीं. पाडेगांव येथें या जातीच्या उसाचें एकरीं सरासरी उत्पादन ७० टन आलें, तर को. ४१९ चे ५२ टन आलें. ही जात को. ४१९ पेक्षा १–२ महिन्यांनीं उशिरा तयार होत असल्यानें साखर कारखान्यांना उशिराच्या गळितास वापण्यास ही जात योग्य होय. भारी व चांगल्या निचऱ्याच्या जमिनींतच ही जात चांगलें उत्पन्न देऊं शकतें. या जातीचा गूळ चांगला होत असून कणालहि चांगला निघतो. खोडवा साधारणच येतो. आडसाली लागणीस जास्त लोळतें. ऑक्टोबर व सुरू लागणीस योग्य. या जातीवर विशेष अपायकारक रोग अजून आढळला नाहीं.

## उसाच्या सुधारलेल्या जातींसंबंधी थोडक्यांत माहिती

( अडसाली उसाची तीन वर्षांची सरासरी )

| अनु. नंबर | तपशील | को. ४१९ | को. ६७८ | को. ७४० | को. ७७५ | को. ७९८ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | उसाचें एकरीं उत्पादन | ५१·३२ टन | ६५·४३ टन | ६८·१४ टन | ६०·४३ टन | ७०·१७ टन |
| २. | को. ४१९ पेक्षां किती टक्के जास्त | — | २७·७१ | ३३·०१ | १७·९ | ३६·९ |
| ३. | साखरेचें एकरीं उत्पादन | ७·४४ टन | ८·८५ टन | ९·९६ टन | ९·२२ टन | ९·३९ टन |
| ४. | को. ४१९ पेक्षां किती टक्के जास्त | — | १९·३ | ३३·९ | २३·९ | २६·९ |
| ५. | गुळाचें एकरीं उत्पादन | ६·३० टन | ७·१२ टन | ८·२ टन | ७·७७ टन | ७·६५ टन |
| ६. | गुळाची प्रत | चांगली | मध्यम | उत्कृष्ट | अति उत्कृष्ट | उत्कृष्ट |
| ७. | उसांतील साखरेचें प्रमाण | १८·१८% | १६·७९% | १८·४०% | १९·१७% | १७·२३% |
| ८. | उसांतील काष्टतंतूचें प्रमाण | १२·८२% | १४·७५% | १४·३०% | १३·३२% | १२·३९% |
| ९. | उसांत साखर पूर्ण तयार झाल्यावर त्याच स्थितींत जास्त काळ टिकून धरण्याचा गुण | बरा | फार चांगला | उत्कृष्ट | बरा | उत्तम |
| १०. | पाण्याचा ताण सहन करण्याची शक्ति | चांगली | मध्यम | फार चांगली | बरी | बरी |
| ११. | ऊंस लोळण्याचें प्रमाण | ५३% | ५४% | ५२% | ४०% | ७२% |
| १२. | आयुष्यमान ( पक्क होण्यास लागणारा वेळ ) | मध्यम उशीरा | मध्यम उशीरा | लवकर (को.४१९ पेक्षां) | लवकर (को.४१९ पेक्षां) | उशीरा (को.४१९ पेक्षां) |
| १३. | रोगाविषयीं | ग्रासी शूट थोड्या प्रमाणांत | थोडा रस्ट व रेड शीथ | लीफ स्पॉट | नाहीं | थोडासा लीफ स्पॉट |
| १४. | किड्यांचा प्रादुर्भाव | पिठे किड्यांचा थोडा त्रास | विशेष नाहीं | विशेष नाहीं | विशेष नाहीं | विशेष नाहीं |
| १५. | तुरा येतो काय ? | होय | होय | होय | होय | होय |
| १६. | खोडवा कसा येतो ? | चांगला | चांगला | उत्कृष्ट | चांगला | बरा |
| १७. | चांगल्या उत्पन्नासाठीं जमीन प्रकार | कोणत्याहि प्रकारावर चांगलें उत्पन्न | हलक्या जमिनीवर चांगलें उत्पन्न तसेंच चोपण जमिनीवर पण टिकाव धरते. | भारी व योग्य निचऱ्याची | भारी व योग्य निचऱ्याची-खारट व चोपण जमीन चालते | भारी व योग्य निचऱ्याची |

### बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्सचें उद्घाटन

डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्सनें सुरू केलेल्या बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्सचें उद्घाटन सोमवार, दि. १ रोजीं बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे मॅनेजर, श्री. चिं. वि. जोग, ह्यांनीं केलें. ह्या कोर्ससाठी वेगवेगळ्या बँकांतून, त्याचप्रमाणें बाहेरचेहि विद्यार्थी दाखल झाले असून, प्रस्तुत उपक्रमाचें उत्कृष्ट स्वागत झालें आहे. कोर्सचा अभ्यासक्रम बँकांत काम करणारांची प्रत्यक्ष तयारी करून घेण्याच्या दृष्टीनें आखलेला आहे; तेव्हां ते विद्यार्थी इतरांच्यापेक्षा कार्यक्षम ठरतील व त्यांना नोकरीच्या बाबतींत प्राधान्य मिळेल, अशी अपेक्षा श्री. जोग ह्यांनीं व्यक्त केली.

### डचेस ऑफ विंडसरच्या लेखनाची किंमत

डचेस ऑफ विंडसर (आठव्या एडवर्डची पत्नी) हिनें 'मॅकॉल्स' ह्या अमेरिकन मासिकासाठी लिखाण करण्यास मान्यता दिली आहे. हें मासिक सध्यांच एलेनर रूझवेल्ट व क्लेअर बुस ल्यूस ह्या दोघींना दर वर्षीं त्यांच्या १२ छोट्या लेखांसाठी प्रत्येकी दीड लक्ष रुपये देत आहे. डचेस ऑफ विंडसरला त्याहिपेक्षा ज्यास्त मोबदला दिला जाणार आहे. ड्यूक ऑफ विंडसरलाहि अशीच मोठी प्राप्ति झाली होती.

# STURDY — STABILITY

*Elegence* — *Precision*



Great pyramids and sphynx in Egypt are a puzzle to the modern world. They possess incredible intricacy of sturdiness and craftsmanship. They stand centuries together undamaged—Really a wonderful example for sturdiness. As well it is miracleously intricated with craftsmanship. Very few are the examples of such type where sturdine ss & elegance go hand in hand.

Similarly in machinery world of today, sturdiness and precision workmanship is well needed. A slightest mistake in designing and workmanship means an immeasurable loss of money, time and work.

**We stand for....**

Cams & keys of various types.
Plastic & Rubber plantation equipment, Extruders, Spreading machines & mixing mills.
Chemical Engineering equipment, Auto-cloves, pressure-pans, Kiers etc.
Calenders, Beaters and presses of various types
Die-punches & moulds.

**For success**



THE SOUTHERN
MACHINE INDUSTRIES
GULTEKDI ROAD, SWARGATE POONA 2.

Phone : 6640.
Gram : 'SOUMACHINE'

Proprietor . SUPANEKAR BROS.

PARKERSON



'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार



[illegible]
( सुखी जीवनाच्या [illegible] )
लेखक:—श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ कि. १ रु. ८ आ.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश [illegible] यांनी छापिलें व [illegible] वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.